सूचना का अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- २१३/२०१९**

**तक्रारकर्ता श्री. विनोदकुमार बंशराज मौर्य**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार**
उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.), भांडूप यांचे कार्यालय, टोपीवाला कॉलेज इमारत,
तळमजला, सरोजिनी नायडू रोड, मुलुंड पश्चिम, मुंबई ४०००८०.

**प्रथम अपिलीय अधिकारी**
उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.), भांडूप यांचे कार्यालय, टोपीवाला कॉलेज इमारत,
तळमजला, सरोजिनी नायडू रोड, मुलुंड पश्चिम, मुंबई ४०००८०.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २२.०८.२०२४**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र.MHSICMU/२०१९/M/०००२२२ प्रकरणी आयोगाने दि.१२.०३.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"जन माहिती अधिकारी यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडून अपिलार्थी यांनी मागितलेल्या सर्व सीडी प्राप्त करुन १५ दिवसामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(६) अंतर्गत निशुल्क पुरवाव्या. अपील निकाली काढण्यात येत आहे."*

उक्त आदेशानुषंगाने तक्रारकर्ता यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. ०२.०५.२०१९ रोजी आयोगासमोर तक्रार अर्ज दाखल केला. सदर तक्रारीवर जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपजिल्हाधिकारी (अति/ निष्का) भांडूप यांचे कार्यालय, मुलुंड (पश्चिम), मुंबई यांच्याकडून आयोगाने दि.२३.०५.२०१९ च्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (अति/ निष्का) भांडूप यांनी त्यांचा अहवाल दि. ०७.०६.२०१९ आयोगास सादर केलेला आहे.

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी असे सादर केले की, त्यांच्याकडे सदर प्रकरणी कोणतेही कागदपत्रे उपलब्ध नाहीत. जन माहिती अधिकारी यांना आयोगाच्या अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात आली. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २३.०९.२०२४ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

निर्गमित
दिनांक 28 AUG 2024
मुंबई

**दिनांक : २६.०८.२०२४**

State Information Commission Greater Mumbai

प्रदीप व्यास
26-8-2024.
**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

## रामाआ- तक्रार क्र. बीएम- २१३/२०१९
## तक्रारकर्ता श्री. विनोदकुमार बंशराज मौर्य

**सुनावणी दिनांक : २३.०९.२०२४ (In continuation of order dt २६.०८.२०२४)**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

या प्रकरणी आयोगाने दिनांक २६.०८.२०२४ रोजी पुढीलप्रमाणे आदेश पारीत केले होते:

" सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असे सादर केले की, त्यांच्याकडे सदर प्रकरणी कोणतेही कागदपत्रे उपलब्ध नाहीत. जन माहिती अधिकारी यांना आयोगाच्या अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात आली. सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि.२३.०९.२०२४ रोजी घेण्यात येईल.

उक्त आदेशानुषंगाने आजच्या सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे निवेदन दिनांक २३.०९.२०२४ आयोगास सादर केले. ते अभिलेखावर घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी मुख्य समन्वय अधिकारी, बायोमॅर्टीक सर्वेक्षण कक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचे दि.१९.०९.२०२४ चे पत्र आयोगास सादर केले. जिथे की, बायोमॅर्टीक सर्वेक्षण कक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी जन माहिती अधिकारी यांना झोपडी क्रमांक S_१२६०१५९१, S_१२६०१५९२, S_१२६०१५९४ या तीनही झोपडींबाबत सर्वेक्षण केल्याची माहिती पेनड्राईव्हमध्ये उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच तसेच सदर पत्रात असे नमूद केले आहे की, झोपडी क्रमांक S_१२६०१५९० चे बायोमेट्रीक सर्वेक्षण करण्यास झोपडीधारकांने नकार दिल्याने सर्वेक्षण करण्यात आलेले नाही.

सुनावणी दरम्यान सदर पत्राची प्रत व पेनड्राईव्हमधील माहिती जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्त्यास उपलब्ध करुन दिली.

तक्रारकर्त्यांनी आयोगास लेखी सादर केले की, त्यांना बायोमॅर्टीक सर्वेक्षणाची माहिती प्राप्त झालेली आहे परंतू पेन ड्राईव्हमध्ये व्हीडीओ रेकॉर्डींग नाही.

जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा एकदा मुख्य समन्वय अधिकारी, बायोमॅट्रीक सर्वेक्षण कक्ष यांना संपर्क साधून व्हीडीओ रेकॉडींग उपलब्ध असल्यास ते पण तक्रारकर्त्यास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसात नि:शुल्क उपलब्ध करुन द्यावेत.

### आदेश

**१. जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२. पुढील सुनावणी २३.१०.२०२४ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल**

प्रदीप व्यास
२४-९-२०२४

State Information Commission Greater Mumbai

**मुंबई**
**दिनांक : २४.०९.२०२४**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**